| MHNS240008752022 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०४/२०२२ मधील नि.क्र.१३ वरील आदेश |
| --- | --- |
| | विठ्ठल फकिरा वानले<br>वि.<br>दौलत कारभारी ढेपले व इतर |

प्रस्तुतचा अर्ज सा.वाला यांनी त्यांना म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होउन त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीत सादर केला आहे. सदर आदेश याच अर्जावर असल्याने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचा याठिकाणी उहापोह करण्यात आला नाही.

**०२.** अर्जदार यांनी सदर अर्जावरच त्यांचा खुलासा दाखल करून सा.वाला यांच्या अर्जास प्रखर आक्षेप घेउन दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याच्या हेतुने सदर अर्ज दाखल केला असल्याचे नमुद केले आहे. सा.वाला यांनी विहीत मुदतीत म्हणणे सादर करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केलेले नाही. सा.वाला यांनी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही समाधानकारक कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली व पर्यायी रक्कम रु.५,०००/- चे कॉस्टवर अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली.

**०३.** अभिलेखाची पाहणी केली असता अर्जदार यांनी कोर्टाच्या हुकुमाचा भंग व अवमान सा.वाला यांनी केल्याने सदर अर्ज दाखल केलेला आहे. सा.वाला हे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध करत आहेत. सदर अर्ज हा कोर्टाच्या हुकुमाचा भंग व अवमान केल्या संदर्भात आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचे हक्कसंबंध व त्यांचे कथन गुणदोषारोवर सिध्द करण्याकामी परवानगी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे असले तरी, सा.वाला यांना म्हणणे दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर विलंब काही रक्कम खर्च म्हणुन त्यांच्याकडुन अर्जदार यांना दिल्यास प्रकरणाचा उद्येश सफल होईल व सदर प्रकरण हे गुणदोषारोवर न्यायनिर्णीत होण्यास मदत होणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यावर उभय पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत व गुंतागुंत वाढणार नाही. सबब, निम्न आदेश.

## आ दे श

०१. सा.वाला यांचा नि.क्र.१३ वरील अर्ज त्यांनी अर्जदार यांना रक्कम रुपये २००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. सा.वाला यांनी कलम ०१ मधील पुर्तता केल्यास त्यांना म्हणणे अभिलेखावर सादर करण्याची परवानगी देण्यात येते.

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2025.08.19 13:28:13 +0530

**दि. १९/०८/२०२५** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**

**ठिकाण- सटाणा.** **दिवाणी न्यायाधिश क. स्तर, सटाणा.**